आधुनिक विचारांचे
# वर्तमान

नवरात्रीच्या मंगल समयी आई तुळजाभवानी तुम्हाला सुख, समृद्धी, सौख्य, ऐश्वर्य प्रदान करो तुमच्या सर्व मनोकामना पूर्ण होवो, हीच प्रार्थना



घटस्थापना व नवरात्र उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!

बीड । मंगळवार, ५ ऑक्टोबर २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ४९ । पाने : ४ । मूल्य २ ₹

# अतिउत्साही माजलगावकरांपुढे प्रशासन हतबल

वर्तमान विशेष

गेल्या आठवड्यात महाराष्ट्रासह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घालता होता. अतिवृष्टीमुळे नद्यांना महापूर आले. हिरवीगार पीके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. शेकडो गावांचा संपर्क तुटला आहे. परिस्थिती हाताळताना शासन-प्रशासनाची दमछाक होताना दिसत आहे. मराठवाड्यातील मोठे असलेल्या जायकवाडी धरण १०० टक्के भरले आहे. धरणाच्या दरवाज्यातून हजारो क्युसेस पाण्याचा विसर्ग होत आहे. त्यामुळे गोदाकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. जायकवाडी पाठोपाठ माजलगाव धरण १०० टक्के भरले आहे. या धरणाचे दरवाजे उघडले असून त्यातूनही हजारो क्युसेस पाण्याचा विसर्ग सिंदफणा नदीपात्रात सोडण्यात आलेला आहे. गेल्या आठवड्यात सिंदफणा नदीवरील जुना पूल पाण्याखाली गेला होता. पुलावरून पाणी जात असल्याने माजलगावकरांनी स्थानिक पर्यटन म्हणून पुलाकडे गर्दी करायला सुरूवात केली आहे. हा धोकादायक पूल गेल्या दीड वर्षापासून अवजड वाहतुकीस बंद करण्यात आलेला आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंचे कठडे तुटून गेलेली आहेत. प्रशासनाने हा पूल धोकादायक असल्याचे स्पष्ट नमूद केलेले असतानाही माजलगावकर मात्र सेल्फी पॉईंट करून आपले जीवन धोक्यात घालत आहेत. स्थानिक पोलिस प्रशासनाला न जुमानता अतिउत्साही माजलगावकर स्मार्ट फोन घेवून सेल्फी काढण्यात दंग झालेले आहेत. गेल्या आठवडाभरापासून अतिउत्साही माजलगावकर जून्या पुलावर येवून फोटोशूट करत आहेत. पोलीस प्रशासनाने आवाहन केले तरी ते धुडकावून धोकादायक पुलावरून ये-जा करत आहेत. या प्रकाराबाबत सोशल मीडियावरही जागरूक राहण्याचे आवाहन केले जात असले तरी त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. धोकादायक पुलावरील रहदारी वाढत आहे. भविष्यात माजलगावकर मोठ्या दुर्घटनेला कारणीभूत ठरतील काय? अशी भीती व्यक्त केली जात आहे. काँग्रेसचे युवा नेते दत्ता कांबळे यांनी सतर्कता दाखवून हा धोकादायक जुना पूल कायमस्वरूपी बंद करण्यात यावा, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे. दत्ता कांबळे यांच्या मागणीला सजग माजलगावकरांनी पाठिंबा देण्याची गरज आहे.

संबंधित वृत्त पान चारवर..

### काँग्रेसचे युवा नेते सरसावले



सिंदफणा नदीवरील जुना पूल बंद करा, या मागणीचे निवेदन नायब तहसिलदार अशोक भंडारे यांना देताना काँग्रेसचे युवा नेते दत्ता कांबळे व कार्यकर्ते.

### वाचकांना सॅल्यूट!

आधुनिक विचारांचे वर्तमान सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून पत्रकारिता करत आहे. माजलगाव मतदारसंघातील 'वर्तमान'ने अनेक प्रश्नांचा मागोवा घेत प्रशासनाचे लक्ष वेधलेले आहे. २९ सप्टेंबर रोजी 'अतिउत्साही माजलगावकरांना कुणी आवरा रे!' हे विशेष संपादकीय लिहीले. ऑनलाईन वर्तमान न्यूजपोर्टलला २ हजार ६३५ वाचकांनी भेट देवून वाचले. एका ज्वलंत विषयाला हात घातल्याबद्दल अनेक माजलगावकरांनी याबाबत 'वर्तमान'चे कौतुक केले. 'वर्तमान'च्या आवाहनाला दिलेल्या प्रतिसादाबद्दल माजलगावकरांना सॅल्यूट!

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

## फास्टट्रॅकन्यूज



### आमदार प्रकाश सोळंकेंनी घेतला सद्यस्थितीचा आढावा

माजलगाव : माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी तहसिल कार्यालयात सद्यस्थितीबाबत सोमवारी आढावा बैठक घेतली. या बैठकीत शेतकऱ्यांचा दिलासा देण्याबाबत सरकारचे सुरू असलेले प्रयत्न आणि पुढील कामकाजाचे निर्देश संबंधितांना देण्यात आले. सप्टेंबर २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या सर्व प्रकारच्या नुकसानी संदर्भात, खरीप हंगाम २०20 पिक विमा वाटप बाबत सद्यस्थिती, खरीप हंगाम २०२१ पिक विमा सद्यस्थिती, साथीच्या रोगाचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासंदर्भात उपाययोजना याबद्दल तहसिल कार्यालय येथे आढावा बैठक घेण्यात आली. माजलगाव, धारूर, वडवणी तीन तालुक्यातील आनेवारी पन्नास टक्के पेक्षा जास्त देऊन चुकीची माहिती दिल्याचे निदर्शनास आले यामुळे शासनाच्या मदतीपासून शेतकरी वंचित राहील. त्यामुळे चुकीची आनेवारी तात्काळ दुरुस्त करून सुधारीत अंतिम अहवाल देण्याचे आदेश दिले.

### कोरोनाबाधितांची संख्या घटतेय

नवी दिल्ली : देशात सोमवारी २० हजार ७९९ नव्या कोरोना रूग्णांची नोंद झाली होती. ही नोंद रविवारच्या तुलनेत ८.९ टक्क्यांनी कमी होती. तर सोमवारी देखील या रूग्णसंख्येत पुन्हा घट झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे, देशात सलग होणारी ही घट निश्चितच एक दिलासादायक चित्र आहे. महाराष्ट्राचा विचार करता, राज्यात सोमवारी दिवसभरात ५ हजार ३८९ रूग्ण कोरोनामधून बरे झाले आहेत. तर, २ हजार २६ नवीन कोरोनाबाधित आढळले आहेत. याचबरोबर २६ कोरोनाबाधित रूग्णांचा मृत्यू झाल्याची देखील नोंद झाली आहे. तर, राज्यात सोमवारपर्यत एकूण ६३ लाख ८६ हजार ०५९ कोरोना बाधित रूग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. यामुळे राज्यातील रूग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.३१ टक्के एवढे झाले आहे.

# अफवांचा व्हायरस

## पक्षांतराच्या फेकन्यूजमुळे राजकीय नेते हैराण

प्रतिनिधी

माजलगाव : अफवांचा व्हायरस बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पसरत असल्याने राजकीय नेते मात्र हैराण झाले आहेत. पक्षांतराच्या बिनबुडाच्या बातम्या सोशल मीडियावर प्रसारित करून काही नेटकरी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा बातम्यांची खातरजमा करूनच सत्यता पडताळून पहावी, असा सूर राजकीय वर्तुळात उमटला आहे.





जिल्ह्याच्या राजकारणात सध्या विविध पक्षांचे नेते पक्षांतर करणार असे बनावट वृत्त सोशल मीडियावर प्रसारित केले जात असल्याने काही राजकारण्यांना मात्र मनस्ताप सहन करावा लागत आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे या शिवसेनेत जातील, अशी अफवा सोशल मीडियावर काही दिवसांपूर्वी प्रसारित करून संभ्रमाचे वातावरण निर्माण केले होते. भाजपचे माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार रमेश आडसकर राष्ट्रवादीत जातील, अशा आशयाचे वृत्तही प्रसारित झालेले आहे. माजलगाव पंचायत समितीचे उपसभापती डॉ.वसिम मनसबदार यांनाही नेटकऱ्यांच्या फेकन्यूजमुळे मनस्ताप सहन करावा लागला आहे. डॉ.मनसबदार यांनी याबाबत अधिकृत खुलासा केला असून त्यांनी म्हटले आहे की, आपण शिवसेनेत जाणार ही फेकन्यूज असून माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या सोबत सदैव आहे.

आमदार प्रकाश सोळंके जोपर्यंत राजकारणात असतील तोपर्यंत आपण त्यांच्या समवेतच आहे. त्यामुळे राष्ट्रवादी सोडण्याचा प्रश्न येतो कुठे? अशी भूमिका डॉ.मनसबदार यांनी मांडली आहे.

### सध्या पक्षांतरचा काळ नाही : दत्ता देशमुख



अफवांच्या पक्षांतराबाबत 'वर्तमान'शी बोलताना राजकीय विश्लेषक दत्ता देशमुख म्हणाले, सध्या पक्षांतराचा काळ नाही. रमेश आडसकर हे माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार आहेत. त्यामुळे ते राष्ट्रवादीत जातील, अशी काही परिस्थिती नाही. विधानसभा निवडणूक जवळ आली की, पक्षांतर होत असतात. नेते, कार्यकर्ते चलबिचल करत असतात. मात्र सध्या पक्षांतराचा काळच नाही, असेही देशमुख म्हणाले.

### सोशल मीडियाची विश्वासार्हता संपतेय : शशांक सोळंके



सोशल मीडियावर कोणत्याही बातम्यांची सत्यता पडताळून पाहिली जात नाही. त्यामुळे त्या माध्यमाची विश्वासार्हता संपत चालली आहे, असे आपले स्पष्ट मत आहे. अशी प्रतिक्रिया पंचायत समितीचे सदस्य तथा आमदार प्रकाश सोळंके यांचे खंदे समर्थक शशांक सोळंके यांनी दिली. सोळंके म्हणाले, सध्याचा काळ सवंग प्रसिद्धीचा आहे. सोशल मीडियावरील अफवा त्याची विश्वासार्हता कमी करत आहेत. सध्या पूरपरिस्थिती असल्याने प्रमुख नेते जनसामान्यांच्या कामात सक्रीय झालेले आहेत. त्यामुळे नेते पक्षांतर करण्याचा प्रश्नच नाही. नेटकऱ्यांनी संबंधित नेत्यांना त्यांचे काम करू द्यावे, अफवा पसरवू नयेत. असा सल्ला सोळंके यांनी दिला.

# नुकसान-भरपाईबाबत लवकरच निर्णय : पवार

प्रतिनिधी

पुणे : पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, आदी भागांत पावसाने दाणादाण उडवली. यामध्ये बळीराजाचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. चिंताग्रस्त बळीराजाला दिलासा देण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येत्या कॅबीनेटमध्ये नुकसानग्रस्तांच्या मदतीबाबत निर्णय घेतला जाईल, असा शब्द शेतकऱ्यांना दिला आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार शनिवारी पुणे दौऱ्यावर होते. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. राज्यात लाखो हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. हजारो हेक्टर शेती अजूनही पाण्याखाली आहे. सोयाबीन, कपाशीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या सगळ्यानंतर आता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे सरकारच्या मदतीकडे डोळे लागले आहेत. याच शेतकऱ्यांना पुढच्या आठवड्यात मदतीचा शब्द अजित पवार यांनी दिला आहे. शेतकऱ्यांसाठी काही पॅकेज जाहीर करणार आहात का? शासनस्तरावर काय मदत केली जाणार आहे?, असे पत्र यावेळी पत्रकारांनी विचारले. त्यावर येत्या कॅबिनेटमध्ये निर्णय घेऊ आणि लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत कशी मिळेल, हे पाहिले जाईल, असे अजित पवार म्हणाले. लवकरात लवकर शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळाली पाहिजे, अशा सूचना विमा कंपन्यांना दिलेल्या आहेत, असे अजित पवार यांनी सांगितले.



### प्रदिप तांबे, अभिजीत देडे शिवसेनेत दाखल

प्रतिनिधी

माजलगाव : शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या उपस्थितीत सोमवारी अंबाजोगाई येथे प्रदिप तांबे, अभिजीत देडे यांच्यासह अनेक युवकांनी शिवसेनेत प्रवेश केला.

अंबाजोगाई येथे सोमवारी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, माजी मंत्री बदामराव पंडीत, बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव, कुंडलिक खांडे आदींच्या साक्षीने प्रदिप तांबे, अभिजीत देडे यांच्यासह अनेक युवकांचा शिवसेनेत प्रवेश झाला. शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी आणि शिवसेनेचा विचार तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी आपण शिवसेनेत प्रवेश केला असल्याची प्रतिक्रिया प्रदिप तांबे यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

# रस्त्यासाठी चाटगावकरांची सर्वपक्षीय एकजूट

## ११ ऑक्टोबर रोजी बीड-परळी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन

प्रतिनिधी

धारूर : तालुक्यातील चाटगाव जोडरस्त्याच्या डांबरीकरण दुरुस्तीचे काम त्वरित करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी ग्रामस्थ एकवटले आहेत. येत्या ११ ऑक्टोबर रोजी भाजपा युवा नेते बालासाहेब केकान यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या रास्ता रोको आंदोलनात मतभेद विसरून सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते आंदोलनात सहभागी होत आहेत.

धारूर तालुक्यातील मौजे चाटगाव येथील जोडरस्त्याच्या दुरूस्तीचे काम गेल्या कित्येक वर्षापासून रखडलेले आहे. याबाबत शासन-प्रशासनाला अनेकवेळा रस्त्याबाबत निवेदने दिली. मात्र प्रत्येकवेळी चाटगावकरांची निराशा झाली.

आता ही मागणी धसास लावण्यासाठी पक्षीय मतभेद विसरून समस्त चाटगावकर ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता बीड-परळी महामार्गावरील चाटगाव फाट्यावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. हे आंदोलन कुठल्याही राजकीय हेतूने नसून गावाच्या महत्त्वपूर्ण विषयावर असल्याने ग्रामस्थांनी या आंदोलनात सहभाग नोंदवून प्रशासनाचे लक्ष वेधावे, असे आवाहन भाजप युवा नेते बालासाहेब केकान यांनी केले आहे. या आंदोलनात राष्ट्रवादीचे युवा नेते गोविंद पांडुरंग केकान, केशव केकान, भाजपचे महादेव केकान, बाळासाहेब सांगळे, श्रीधर सांगळे, धनराज सांगळे, माजी सैनिक अर्जून केकान, सामाजिक नेते दीपक गडसिंग, सतीश देशमाने, बंडू सांगळे, राधाकिसन पोटे, लक्ष्मण चौरे आदींसह ग्रामस्थ उपस्थित आंदोलनात सहभागी होणार आहेत.



## संपादकीय

# सायबर दरोडेखोरी रोखण्याची गरज

आपण आज स्मार्टफोनच्या युगात जगत आहोत. मात्र सायबर गुन्हेगारी वाढताना दिसत आहे. या प्रवृत्तीला वेळीच रोखण्याची गरज आहे. गेल्या दोन वर्षापासून कोरोनाच्या जीवघेण्या प्रसारामुळे संपूर्ण जगात लॉकडाऊनची परिस्थिती उद्भवली आणि लोकांना घरात राहणे भाग पडले. शाळा, महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. अनेक खासगी कार्यालयांतील कर्मचारी देखील घरूनच ऑफिसचे काम करायला लागले. तसे सगळे जग इंटरनेटवर अवलंबून राहायला लागले. बाहेर कुठे जायचे नाही, त्यामुळे ऑनलाइन खरेदीचा फंडा सुरू झाला. या काळात तंत्रज्ञानाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. मात्र याच काळात सायबर सुरक्षेचे विविध प्रश्न आणि समस्या निर्माण झाल्या. कोरोना काळात सायबर गुन्ह्यांमध्ये १२ टक्क्यांनी वाढ झाली. सायबर क्राइम झपाट्याने वाढीला लागला. आपण रोज बातम्या ऐकतो, वाचतो, वृद्ध दाम्पत्याला लाखोंचा गंडा, एखाद्या तरुणाला नोकरीचे आमिष दाखवून पैसे उकळण्याची घटना किंवा फेसबुकवरून मैत्री करून एखाद्या मुलीला फसवले, लॉकडाऊनच्या काळात अशा गुन्ह्यांना ऊत आला आहे. विशेषत: आर्थिक गुन्हे आणि फसवणूक खूप वाढली आहे. याला महिला, वृद्धा आणि अगदी सनदी अधिकारी सुद्धा बळी पडत आहेत. कारण इंटरनेट बँकिंग. अनोळखी व्यक्तींना आपल्या बँक खात्याची माहिती देणे. ओटीपी सांगून हॅकर्स पूर्ण खाते रिकामे करतात. अशा घटनांमध्ये केवळ मुंबई आणि महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशात वाढ झाली आहे. २०२०च्या मार्च महिन्यात लॉकडाऊन जाहीर झाला. त्यानंतर संपूर्ण देशातील १९ शहरांमध्ये एकूण १८ हजार ८६७ सायबर गुन्हे नोंदविले गेले. त्यामध्ये सर्वाधिक गुन्हे बंगळूरु शहरात घडले. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या (एनसीआरबी) माहितीनुसार या काळात एकट्या बंगळूरुमध्ये ८ हजार ८८० सायबर गुन्हे नोंदविले गेले, तर हैदराबादमध्ये २ हजार ५५३ सायबर गुन्हे घडले, तर तिसऱ्या क्रमांकावर मुंबई आहे. मुंबईमध्ये गेल्या वर्षभरात २ हजार ४०० सायबरशी संबंधित गुन्हे नोंदविले गेले. लखनऊमध्ये १४००, तर दिल्लीमध्ये १६६ गुन्हे घडले. सायबर गुन्हा घडला, लक्षात आला की, लगेच तक्रार नोंदविणे आवश्यक असते. कारण पोलीस लगेच त्या तक्रारदाराचे बँक खाते बंद करतात. म्हणजे, आणखी रक्कम त्या खात्यातून काढता येत नाही. पण अनेक वेळा गुन्हा घडून गेल्यावर खूप काळाने तक्रार नोंदविली जाते. तोपर्यत गुन्हेगाराने बँक खाते रिकामे केलेले असते. आता तर सायबर गुन्ह्याच्या तक्रारी नोंदविण्यासाठी पोलीस स्टेशनला जाण्याची गरज नसते, तर ऑनलाइनही तक्रार नोंदविता येते. सायबर गुन्ह्यांमध्ये फिशिंग, हॅकिंग, सायबर बुलिंग, डेटा चोरी, क्रिप्टोग्राफी, सॉफ्टवेअर पायरसी, सायबर स्टोकिंग, पॉर्नोग्राफी या गुन्ह्यांचा समावेश होतो. याशिवाय अश्लील छायाचित्रे काढणे, ती प्रसारित करणे, अश्लील लिखाण करणे, विवाहविषयक फसवणूक, बदनामी करणे, अफवा पसरविणे, खोट्या बातम्या प्रसारित करणे, ब्लॅकमेलिंग करणे, स्टोकिंग म्हणजेच इंटरनेटद्वारे त्या व्यक्तीचा पाठलाग करणे, त्याच्यावर नजर ठेवणे, असेही गुन्हे केले जातात. अनेकदा फोन करून तुम्हाला लॉटरी लागली आहे’ किंवा तुम्हाला भेटवस्तू मिळणार आहे’ असे संगितले जाते. त्यासाठी बँक खात्याची माहिती विचारली जाते. आपण आपली बँकेची माहिती अनोळखी व्यक्तींना देऊन मोठी चूक करतो. कारण या लॉटरीच्या रकमेच्या आशेने किंवा गिफ्ट मिळणार या आनंदात आपण असताना आपले बँक खाते भामट्यांनी रिकामे केलेले असते. सायबर गुन्ह्यांसाठी स्वतंत्र विभाग मुंबई पोलिसांनी तयार केला आहे. मात्र त्यामध्ये सायबर तंत्रज्ञांची संख्या खूपच कमी आहे. खरे तर, पोलिसांनाही सायबर गुन्हे शोधण्याचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. आज-काल शाळा आणि महाविद्यालयेही ऑनलाईन असतात. त्यामुळे लहान मुलांच्या हातात स्मार्टफोन असतात. मुलांनाही खूप उत्सुकता असते, त्यामुळे त्यांच्याकडून नकळत ही माहिती किंवा लोकेशन कळविले जाते आणि मग भामट्यांचे फावते. म्हणूनच सध्याच्या काळात लहान मुलांवर आपण जसे इतर संस्कार करतो, तसेच सायबर संस्कार करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर नागरिकांनी जागरूक राहणेही आवश्यक आहे. कारण एकूणच आता सामान्य माणसांनाही डिजिटल माध्यमाचा वापर करावा लागतो. त्यामुळे त्यांनी दक्षता पाळणे आवश्यक आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेनेही याबाबत बँकांना दक्षता घेण्यास सांगितले असून यापुढे बँक खात्यातून पैसे जाण्यापूर्वीच खातेदाराला त्याच्या मोबाईलवर संदेश येईल आणि त्याने अनुमती दिली तरच बँक खात्यातून पैसे जातील. सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी शासन-प्रशासन प्रयत्नशील असले तरी प्रत्येकाने एक सजग नागरिक म्हणून काळाची पावले ओळखून काम करणे गरजेचे आहे.

# तिसऱ्या लाटेची केवळ चर्चा?

**कोरोनाचा संसर्ग कमी होत असल्यामुळे महाराष्ट्र सरकारने शाळा आणि धार्मिक स्थळं खुली करण्याचा निर्णय घेतलाय. पण अनेकजण तिसऱ्या लाटेची भीती व्यक्त करतायत. वास्तविक सिरो सर्वेची आकडेवारी आणि झालेलं लसीकरण पाहता बहुसंख्य लोकांमधे अँटिबॉडी विकसित झालेली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर तिसरी लाट येण्याची शक्यता धूसर बनलीय.**

आज-काल
**डॉ.अनंत फडके**

कोरोना प्रसारकाळात दीर्घकाळ बंद राहिलेल्या शाळा आणि इतर सार्वजनिक जागा सुरू करण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय गरजेचा होता. ऑगस्ट महिन्यामधे महाराष्ट्रातल्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या टास्क फोर्सने शाळा सुरू करायला विरोध दाखवला होता, तेव्हाच जनआरोग्य अभियानामार्फत पत्रक काढून ही भूमिका अशास्त्रीय असल्याचं निदर्शनास आणून दिलं होतं. गेल्या जवळपास दोन वर्षापासून शाळा बंद ठेवल्यामुळे मुलांचं शैक्षणिक नुकसान होण्याबरोबरच शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडलंय. अंगणवाड्या, शाळा बंद केल्यामुळे तिथं मिळणारा शिजवलेला पूरक आहार बंद झालाय. घरी कोरडा शिधा दिला जात असला तरी तो मुलांच्या वाट्याला येईलच याची हमी नसते. गरीब स्तरातल्या मुलांमधलं कुपोषण वाढलेलं दिसून आलंय. या वाढीव कुपोषणामुळे त्यांच्यात टीबीचं प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शाळा सुरू केलेल्या त्यांना आणि कुटुंबीयांना होणारा कोरोनाचा धोका याच्याशी या सर्व नुकसानीची तुलना करायला हवी.



मुलांमधे प्रौढ लोकांइतकीच लागण

आयसीएमआरने केलेल्या चौथ्या सिरो सर्वे’च्या जुलैच्या शेवटी प्रसिद्ध झालेल्या निष्कर्षातून भारतात सरासरी ६७ टक्के जनतेमधे कोरोनाची लागण होऊन गेली असल्याचं स्पष्ट झालं होतं. म्हणजेच या लोकांच्या रक्तामधे अँटिबॉडीज तयार झाल्या होत्या. सहा वर्षावरच्या मुलांमधेही लागणीचं प्रमाण जवळपास तेवढंच आहे. याचाच अर्थ शाळा बंद ठेवूनही शालेय वयोगटातल्या लागणीचं प्रमाण प्रौढ लोकांइतकंच आहे. कोरोनाच्या लागणीचं मुलांमधे प्रमाण प्रौढ लोकांइतकंच असलं आणि ० ते १४ वयोगटातल्या मुलांचं एकूण लोकसंख्येतलं प्रमाण २६ टक्के असलं तरी सरकारी आकडेवारीनुसार कोरोनाने दगावलेल्या मुलांचं प्रमाण एकूण कोरोना मृत्यूंच्या ०.५ टक्केही नाही. आपला अनुभवही या आकडेवारीशी जुळतो. बहुसंख्य मुलांना कोरोना लागणीमुळे कोणताही त्रास होत नाही, लक्षणं दिसत नाहीत. गंभीर कोरोना आजाराचं प्रमाणही त्यांच्यात अत्यंत कमी आहे; तर मृत्यूचं प्रमाणही नगण्य आहे. शाळा सुरू केल्या नसतानाही मुलांमधे प्रौढ लोकांइतकीच लागण होत असेल तर मग शाळा बंद ठेवून होणारं मुलांचं शैक्षणिक, सामाजिक, मानसिक महाप्रचंड नुकसान लक्षात घेता आता यापुढे शाळा बंद ठेवणं सामाजिक आरोग्य विज्ञानाशी विसंगत ठरलं असतं.

रोगप्रतिकारक शक्ती वाढतेय

दुसरीकडे राज्यातच काही भागात योग्य काळजी घेऊन अनेक शाळा यापूर्वीच सुरू झाल्या असून त्यांचा अनुभवही नकारात्मक नाही, याचीही नोंद घ्यायला हवी. पुण्या-मुंबईमधे अलीकडे झालेल्या सिरो सर्वेमधे ८० टक्के लोकांच्या रक्तात अँटिबॉडीज सापडलेल्या आहेत. म्हणजेच ८० टक्के लोकांमधे प्रतिकारशक्ती तयार झालेली आहे.

असं असलं तरी राज्यासह देशात सध्या कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची शक्यता चर्चेत आहे. पण कोरोनाची दुसरी लाट अतिप्रचंड असूनही वर म्हटल्याप्रमाणे त्यात लहान मुलांमधे गंभीर आजार, मृत्यू यांचं प्रमाण अत्यंत कमी होतं. आताही तिसरी लाट आली तरी ती दुसऱ्या लाटेसारखी मोठी नसेल. कारण दुसऱ्या लाटेच्या आधी फक्त २४ टक्के जनतेमधे कोरोना लागण झाल्यामुळे कोरोना विरोधी प्रतिकारशक्ती आली होती; तर हे प्रमाण जून-जुलैमधे ६७ टक्क्यांवर पोचलं होतं. आता हा आकडा ७० टक्क्यांपेक्षा जास्त असेल. कारण आजार पसरतो कसा? तर प्रतिकारशक्ती नसलेल्या माणसाच्या शरीरामधे विषाणू शिरतात आणि तिथं त्यांची संख्या वाढते आणि तिथून ते पुढे व्यक्तीच्या शरीरात जातात. पण जेव्हा अशा बहुसंख्य व्यक्तींमधे रोगप्रतिकारक शक्ती तयार असेल तर त्यांच्या शरीरात विषाणूंची वाढ होणं, त्यांची नवी पिढी तयार होणं आणि दुसऱ्या लोकांना त्याची लागण होणं ही प्रक्रियाच थांबते. विषाणूचा प्रसार वेगाने होण्यासाठी किंवा लाट येण्यासाठी रोगप्रतिकारक शक्ती नसलेला मोठा समाज असणं गरजेचं असतं. दुसऱ्या लाटेच्या सुरवातीला अशी स्थिती होती. पण आता तशी स्थिती नाही. आता लसीकरणामुळे आणि अनेक जणांना कोरोना होऊन गेल्यामुळे वेगाने विषाणूसंसर्ग होण्याला मर्यादा येणार आहेत. त्यामुळे मोठी तिसरी लाट येण्याची शक्यता आता कमी आहे.

कोरोनाची शक्यता म्हणून शाळा बंद?

लहान मुलांमधे कोरोनामुळे मल्टिसिस्टीम इन्फ्लेमेटरी सिंड्रोम हा गंभीर आजार होऊ शकतो, हे खरं आहे; पण अशा मुलांचं प्रमाण अत्यंत कमी आहे. हा धोका टाळण्यासाठी लहानपणापासून होणारा मधुमेह, अतिरिक्त वजन, काही गंभीर आजार-आरोग्य प्रश्न असणाऱ्या मुलांना सध्या शाळेत पाठवू नका, असं पालकांना सांगता येईल. कितीही काळजी घेतली तरी शाळेत मुलांना लागण होण्याची शक्यता आहेच. या लागणीपासून त्यांना स्वतःला आजार होण्याची शक्यता नसली तरी त्यांच्यापासून घरातल्या ज्येष्ठ व्यक्तींना आणि मधुमेह असलेल्यांना लागण होण्याची शक्यता आहे. पण आतापर्यंत अशा लोकांपैकी बहुसंख्य लोकांना लागण होऊन गेली आहे किंवा त्यांना प्राधान्याने लस मिळाली आहे. त्यामुळे हे कारणही शाळा बंद ठेवायला संयुक्तिक ठरणारं नाही.

लहान मुलांच्या लसीबद्दल संभ्रम

काही जणांनी लहान मुलांची लस आल्यावर त्यांच्यामधे वेगानं लसीकरण करून मगच शाळा उघडाव्यात, असं मत मांडलं होतं. जागतिक आरोग्य संघटना किंवा भारतातल्या बालआरोग्य तज्ज्ञांची संघटना यांनी मुलांचं लसीकरण होणं, ही शाळा उघडण्याची पूर्वअट ठेवलेली नाही. आयसीएमआरचे प्रमुख बलराम भार्गव यांनी मध्यंतरी शिफारस केली होती की, पूर्वतयारी करून शाळा उघडायला प्राथमिक शाळांपासून सुरवात करावी. लहान मुलांसाठीची लस यायला आणखी काही महिने आहेत. त्याचं पुरेशा प्रमाणात उत्पादन होऊन सर्व मुलांना दोन डोस देण्याचं काम पूर्ण करायला पुढचे काही महिने लागतील. तोपर्यत शाळा बंद ठेवणं संयुक्तिक ठरणारं नाही.

विकसित देशांत शाळा सुरू करण्यापूर्वी मुलांचं लसीकरण ही पूर्वअट ठेवलेली नाही, हेही लक्षात घ्यायला हवं. इंग्लंडमधे लहान मुलांसाठी लस वापरायला परवानगी असूनही फक्त १२ ते १७ वयोगटातल्या विद्यार्थ्यांना ही लस दिली जातेय. मुळात लहान मुलांना कोरोनाची लस द्यावी की नाही यावर तज्ज्ञांचं एकमत नाहीय. बहुसंख्य विकसित देशांनी लॉकडाऊनचे दिवस वगळता बहुतांश वेळा शाळा सुरू ठेवल्या आहेत.

तज्ज्ञ संस्थांच्या मार्गदर्शिका

शाळा चालवताना घ्यायच्या काळजीबद्दल तपशिलात मार्गदर्शिका निरनिराळ्या तज्ज्ञ संस्थांनी दिल्या आहेत. त्यामुळे सुयोग्य मापदंड पाळून आणि पूर्वतयारी करून अंगणवाड्या आणि शाळा लवकरात लवकर सुरू करणं आवश्यकच आहे. तिथला पूरक आहारही सुरू करायला हवा. शाळा सुरू करताना, चालवताना घ्यायच्या काळजीबद्दल मार्गदर्शिका सार्वजनिक आरोग्यशास्त्राच्या आधारे बनवायला हव्यात. उदाहरणार्थ शाळा सुरू करताना सर्व शिक्षक, इतर कर्मचारी यांचं लसीकरण पूर्ण झालेलं असलं पाहिजे. शाळा निर्जंतुक करण्याची गरज नाही. कितीही काळजी घेतली तरी एरोसोल या मार्गाने लागण होऊन काही मुलांना कोरोना आजार होण्याची शक्यता आहे; पण त्याचं खापर मुख्याध्यापकांवर किंवा एखाद्या शिक्षकावर फोडून त्यांच्यावर कारवाई करणं हे प्रकारही टाळलं पाहिजे.

तिसरी लाट केवळ चर्चेपुरती

आजची एकंदर स्थिती पाहता मोठ्या तिसऱ्या लाटेची शक्यता कमी असली तरी डेल्टा व्हेरियंट वेगाने पसरला किंवा तसा एखादा वेरियंट तयार झाला तर मात्र काळजी वाढू शकते. कारण या वेरियंटची प्रसारक्षमता अधिक आहे. अल्फा वेरियंटच्या ती दीडपट आहे. डेल्टा वेरियंटपासून सध्या दिल्या जाणाऱ्या लसी ४० ते ५० टक्के लोकांनाच संरक्षण देतात. त्यामुळे तिसऱ्या लाटेची शक्यता राहणार आहे. आज जरी रोगप्रतिकारशक्ती असलेले किंवा अँटिबॉडीज विकसित झालेल्यांची संख्या मोठी असली तरी ती नसलेल्या मोठ्या लोकसमूहात जर या वेरियंटचा शिरकाव झाला; तर त्याची ठिणगी इतकी प्रभावी आहे की, त्यामुळे भडका उडू शकतो. पण ही शक्यता फार कमी आहे.

वेल्लोर इथल्या ख्रिस्तियन मेडिकल कॉलेजच्या विषाणूतज्ज्ञ आणि साथरोगतज्ज्ञ गंगादीप कांग यांनीही तिसऱ्या लाटेची शक्यता कमी असल्याचं मत व्यक्त केलंय. जयप्रकाश मुलिवल यांच्यासारखे विषाणूतज्ज्ञही सांगताहेत की, ८० टक्के लोकांमधे रोगप्रतिकार शक्ती विकसित होईल तेव्हा कोरोना पँडेमिक न राहता एंडेमिक होईल; म्हणजेच ती साथ राहणार नाही. इतकंच नाही तर त्यांनी तिसरी लाट ही आता लोक चर्चेपुरतीच राहील, असंही म्हटलंय. त्यांच्या आणि इतर तज्ज्ञांच्या मते, कोरोनाच्या महामारीमधे ८० टक्के पेक्षा जास्त जनतेत प्रतिकारशक्ती आली की हर्ड इम्युनिटी येऊन साथ संपू लागेल. म्हणजेच उर्वरित २० टक्के लोकांमधे प्रतिकारशक्ती निर्माण झालेली नसली तरी त्यांना आपोआप संरक्षण मिळतं.

कोरोनानं मरायचं की उपाशी?

तिसऱ्या लाटेची भीती बाळगून दैनंदिन व्यवहार आणि व्यापार,उद्योग बंद ठेवून बसण्याची गरज आता संपली आहे. तरीही सर्व काही खुलं झाल्यानंतर काही प्रमाणात बाधितांचा आकडा वाढू शकतो हे गृहित धरून उपाययोजनांच्या पातळीवर तयार राहणं यातच सुज्ञपणा आहे.

आज राज्यात आणि देशात लसीकरणही मोठ्या प्रमाणावर होत आहे. दुसरीकडे जेवढ्या लोकांना या विषाणूची बाधा होते तेवढ्या लोकांमधे रोगप्रतिकारशक्तीही तयार होते, हेही लक्षात ठेवलं पाहिजे. शेवटी विषाणूची लागण होणं हे एक प्रकारचं नॅचरल इम्युनायजेशनच असतं. मात्र त्याची किंमत मोठी चुकवावी लागते. भारतातल्या आकडेवारीनुसार, १० लाख जणांना लागण झाली तर त्यातल्या सुमारे ४०० जणांचा मृत्यू झालेला आहे. याउलट १० लाख जणांना लस टोचल्यास एकाला मृत्यू येतो. थोडक्यात नैसर्गिक रोगप्रतिकारशक्ती तयार होणं हे महागडं’ आहे. पण शेवटी तो निसर्गचक्राचा एक भाग आहे. त्याचा फटका मोठा बसत असल्याने आपण लसीकरणाच्या माध्यमातून कृत्रिम मार्ग निवडतो, की ज्याची फार मोठी किंमत चुकवावी लागत नाही.नैसर्गिक लागणीतून होणारी प्रतिकारशक्ती आणि लसीकरणातून तयार होणारी प्रतिकारशक्ती या सर्वांचा विचार करता तिसरी लाट येण्याची शक्यता फार कमी आहे. त्यामुळे कोरोनानं मरायचं की उपाशी मरायचं’, या लोकभावनांची दखल घेत दैनंदिन व्यवहार पूर्ववत करणं महत्वाचं ठरणार आहे.

# ‘डिजीटल हेल्थ मिशन’ नेमके आहे तरी काय?

**गेल्या वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घोषणा केलेलं 'राष्ट्रीय डिजिटल आरोग्य मिशन' देशभर लागू करण्यात आलंय. देशातल्या प्रत्येक नागरिकाला आता एक हेल्थ आयडी दिलं जाईल. यात आपली सगळी मेडिकल हिस्ट्री असेल. हे आरोग्य क्षेत्रातलं क्रांतिकारी पाऊल समजलं जातंय. पण असं सगळं असलं तरी डेटा सुरक्षेसारखी अनेक आव्हानंही आहेत.**

हेल्थप्लस
**अक्षय शारदा शरद**

सध्या कोरोनाच्या काळात आरोग्य व्यवस्थेवरचा ताण वगैरे बऱ्याच गोष्टी आपण ऐकतोय. मागच्या वर्षभरात अनेक कुटुंबांची झालेली दमछाकही आपण पाहिलीय. घरातल्या एखाद्या व्यक्तीला गंभीर आजार असेल तर आपलंही टेंशन वाढतं. त्या व्यक्तीचं खाणं-पिणं, गोळ्या-औषधं बऱ्याच बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष द्यावं लागतं. आजार तितकासा गंभीर नसेल तर कधीकधी चालून जातं. पण गंभीर आजारांमधे आपल्याला वारंवार हॉस्पिटलच्या फेऱ्या माराव्या लागतात. विशेषतः वयस्कर माणसांना एका ठराविक अंतराने हेल्थ चेकअपसाठी घेऊन जावं लागतं. मग नव्याने कराव्या लागणाऱ्या टेस्ट, रिपोर्टच्या फायली, आलटून पालटून दिलेली औषधं किती आणि काय काय असतं. या मेडिकल डॉक्युमेंटचा एक गठ्ठाच बनतो. कितीही नाही म्हटलं तरी कधीकधी आपण या सगळ्याला कंटाळतो. पण मेडिकल डॉक्युमेंट एका क्लिकवर उपलब्ध झाल्या तर? किती मस्त ना? सगळ्यांचाच ताण हलका होईल की नाही? या सगळ्याचा विचार करून डिजिटल आरोग्य मिशनची घोषणा करण्यात आली होती. यावर्षी ही योजना देशभरात लागू करण्यात आलीय.




गेल्या वर्षी हेल्थ मिशनची घोषणा

चांगल्या आरोग्य सुविधा हा आपला अधिकार आहे. आज बऱ्याच शहरी आणि ग्रामीण भागांमधे पुरेशा आरोग्य सुविधांसाठी माणसांना झगडावं लागतंय. लोकांपर्यत मूलभूत आरोग्य सुविधाही पोचलेल्या नाहीत. कोरोनाच्या काळात तर अधिक प्रकर्षाने हे चित्र समोर आलंय. त्यामुळेच आपली आरोग्य व्यवस्था वेंटिलेटरवर असल्याचं रागाने म्हटलं जातं. गेल्या वर्षी १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनाचं औचित्य साधत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'राष्ट्रीय डिजिटल आरोग्य मिशन'ची घोषणा केली. अगदी सहजपणे लोकांपर्यत आरोग्य सुविधा पोचवण्याचा उद्देश यामागे होता. त्यामुळेच हे आरोग्य क्षेत्रातलं एक क्रांतिकारी पाऊल असल्याचं नरेंद्र मोदींनी म्हटलं होतं. ही योजना प्रायोगिक तत्वावर म्हणून देशातल्या ६ केंद्रशासित प्रदेशांमधे लागू करण्यात आली होती. यात पुदूचेरी, लडाख, दादरा आणि नगर हवेली, चंदीगड, दिव दमण आणि अंदमान आणि निकोबार यांचा समावेश होता. तिथून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे २७ सप्टेंबरला नरेंद्र मोदींनी ही योजना 'आयुष्यमान भारत डिजिटल मिशन' या नावाने देशभरात लागू केली.

हेल्थ आयडीमुळे काम भारी

आपण डॉक्टरकडे गेलो की त्याआधीचे मेडिकल पेपर आपल्याला सोबत ठेवावे लागतात. पेपर हरवले किंवा मग डॉक्टर बदलला तर पुन्हा हेल्थ चेकअप करावं लागतं. पुन्हा नव्याने ट्रीटमेंट सुरू होते. यात वेळही खर्च होतो आणि पैसेही. अशावेळी आपल्या आधीच्या मेडिकल पेपरची माहिती आपल्याकडे कुठंतरी साठवलेली असेल तर? सरकारच्या 'आयुष्यमान भारत डिजिटल मिशन'मुळे हे काम सोपं होईल. या मिशन अंतर्गत नागरिकांना एक हेल्थ आयडी कार्ड दिलं जाईल. यात आपली आरोग्यासंबंधीची सगळी माहिती असेल. थोडक्यात काय तर आपली सगळी मेडिकल हिस्ट्री. म्हणजेच वैद्यकीय तपासणी, आपल्या आजाराविषयी माहिती, डॉक्टरनं दिलेली औषधं असं सगळं काही यात असेल. नागरिकांनी दिलेल्या माहितीच्या आधारे हे हेल्थ आयडी बनवलं जाईल. हे एक डिजिटल माध्यम आहे. त्यामुळे हेल्थ आयडी, पर्सनल हेल्थ रेकॉर्ड सोबत हेल्थ फॅसिलिटी रजिस्ट्रेशन, हेल्थकेयर प्रोफेशनल रजिस्ट्रेशन अशी फीचर्स असल्यामुळे उपचार करणाऱ्या डॉक्टर, हॉस्पिटलना त्याचा फायदा होईल. शिवाय पेशंटवर उपचार करणंही सोपं जाईल.

कागदपत्रांच्या अडगळीतून मुक्ती

या आयडी कार्डच्या रजिस्ट्रेशनसाठी आपल्याला ndhm.gov.in या वेबसाईटवर जावं लागेल. त्यासाठी मोबाईल किंवा आधार क्रमांक गरजेचा आहे. तो टाकला की 'क्रिएट हेल्थ आयडी'वरून पुढची प्रक्रिया करायची. नाव, पत्ता अशी सगळी माहिती भरायची. त्यासाठी सरकारनं 'एनडीएचएम हेल्थ रेकॉर्ड ऍप' बनवलंय. या ऍपमधे आपल्या वैद्यकीय गरजेची आणि आवश्यक सगळी माहिती भरता येईल. डॉक्टर, हॉस्पिटल, मेडिकल स्टोअर, औषध कंपन्या, आरोग्य विमा कंपन्या यांना एका सर्वरशी जोडलं जाईल. त्यामुळे हॉस्पिटलमधे गेल्यावर आपल्या आजाराचं निदान, रिपोर्ट अशी सगळी माहिती डॉक्टरना एका क्लिकवर मिळेल. गावातल्या एखाद्या पेशंटला शहरातल्या डॉक्टरची थेट अपॉइंटमेंटही मिळू शकेल. या हेल्थ मिशनमुळे कागदपत्रांची अडगळ आता राहणार नाही.

# नैसर्गिक आपत्तीशी सामना करण्यास सरकार गंभीर

## पालकमंत्री धनंजय मुंडेंची ग्वाही; ग्रामस्थांशी साधला संवाद

▶ प्रतिनिधी



परळी : कोणत्याही नैसर्गिक आपत्तीशी सामना करण्यासाठी सरकार सर्व पातळ्यांवर खंबीर आहे, अशी ग्वाही बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. त्यांनी परळी तालुक्यातील विविध गावांत ग्रामस्थांशी संवाद साधला.

गेल्या १५ दिवसात बीड जिल्ह्यात जवळपास ४ वेळा ढगफुटी सदृश अतिवृष्टी झाली, नदी काठच्या गावांचे यामुळे शेतीसह, घरे, पशु असे प्रचंड नुकसान झाले. निसर्ग कोपला असला तरीही कुणाचेही घर-संसार उघड्यावर पडू देणार नाही, शासनाच्या माध्यमातून प्रत्येक नुकसानग्रस्त नागरिकाला पुन्हा उभारण्याचे काम केले जाईल, असे पालकमंत्री धनंजय मुंडे म्हणाले. मागील २५ वर्षाच्या काळात इतका पाऊस कधी झाला नव्हता, परळी तालुक्यात वाण नदीने विक्राळ स्वरूप धारण करत एका पात्राचे तीन पात्र केले, पाणी, दगड गोटे शेतांमध्ये शिरले. नुकसान पाहताना शेत कोणते आणि नदी पात्र कोणते असा



सवाल मनात येतो आहे. त्यामुळे झालेले नुकसान हे पंचनामे करण्यापलीकडचे आहे. परळी तालुक्यातील वाणटाकळी, नागापूर, लाडझरी तसेच नागदरा आदी गावांमध्ये झालेल्या नुकसानीची पाहणी करत पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. या काळात प्रशासनाच्या सतर्कतेमुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही याचे समाधानही त्यांनी व्यक्त केले.

बहुतांश ठिकाणी, नदीकाठच्या गावांमध्ये शेतीपिकांचे १०० टक्के नुकसान तर झालेच आहे मात्र जमिनीतील माती अक्षरश: वाहून गेली आहे. त्यामुळे तिथे पंचनामे करण्यासारखे काही उरलेच नाही, अशा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेलच शिवाय पुढच्या हंगामात त्यांना जमिनी कसता याव्यात यासाठीही मदत केली जाणार असल्याचा विश्वास मंत्री मुंडे यांनी दिला आहे. राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना या परिस्थितीचे गांभीर्य अवगत करून दिले आहे व जिल्ह्यासाठी विशेष आर्थिक पॅकेजची व शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीसाठी सरसकट मदत देण्याची मागणी केली असल्याची माहिती पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. परळी तालुक्यातील लाडझरी, नागदरा आदी गावांमध्ये भूगर्भातून गूढ आवाज येत असल्याने गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अत्यल्प काळात झालेल्या प्रचंड पावसाने भूगर्भातील भूजल पातळी वाढली असून त्यामुळे हवेची निर्माण झालेली पोकळी एक विशिष्ट आवाज निर्माण करते. असे प्रकार मराठवाड्यात अनेक ठिकाणी झाले आहेत; पण त्यामुळे भूकंप किंवा अन्य कोणत्याही आपत्तीची सुतराम शक्यता नाही. नागरिकांनी घाबरण्याची अजिबात गरज नाही, असे आवाहन ग्रामस्थांशी संवाद साधून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. यावेळी भूगर्भ व भूजल तज्ज्ञ व अधिकारी-पदाधिकारी उपस्थित होते.



# गोदाकाठच्या ११ गावांचे पुनर्वसन करा : भाई अॅड.नारायण गोले पाटील

▶ प्रतिनिधी

माजलगाव : गेल्या वीस वर्षापासून माजलगाव तालुक्यातील गोदावरी, सिंदफणा नदी काठावर वसलेल्या मंजरथ, शिंपेटाकळी, आळसेवाडी, छत्रबोरगाव, आबेगाव, सरवर पिंपळगाव, आडोळा, गंगामसला, शुक्लतीर्थ लिमगाव, मोगरा, सुरूमगाव या गावांना २००४ पासून सातत्याने अतिवृष्टी व जास्तीचा पाऊस झाला की प्रत्येक वर्षी महापुराचा सामना करावा लागतो. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने गोदाकाठच्या गावाचे तात्काळ पुनर्वसन करावे, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते अॅड.नारायण गोले पाटील यांनी केली आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात अॅड.गोले पाटील म्हटले आहे की, प्रत्येक वर्षी या गावांचा संपर्क तुटला जातो. आमदार, खासदार आणि जनतेचे प्रतिनिधी या गावात जाऊन कमरेवर हात ठेवून परस्थिती पाहतात प्रत्येक वर्षी पुनर्वसनासाठी पाठपुराव्याचे आश्वासन दिले जाते. परंतु कावळ्याच्या गोष्टीप्रमाणे पावसाळा गेला की आमदार, खासदार आणि सरकार या गावांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहत नाही. परिणामी दुसऱ्या वेळेस महापुराचा धोका निर्माण झाला की, पुन्हा त्याच घोषणा तीच आश्वासने ही राजकीय मंडळी देऊन या पूरग्रस्त गावांची दिशाभूल करण्याचे काम करत आहेत. त्यामुळे या पूरग्रस्तगावांना प्रत्येक वेळेस महापुरात दिवस-रात्र जागून काढावी लागते. शासनाने माजलगाव तालुक्यात मोगरा सांडस चिंचोली शुक्लतीर्थ लिमगाव, गंगामसला, छत्रबोरगाव, महातपुरी आदी गावांचे तात्काळ पुनर्वसन करण्यात यावे, अशी मागणी प्रसिध्दी पत्रकाव्दारे शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई अॅड.नारायण गोले पाटील यांच्यासह भाई मुंजा पांचाळ, भाई समाधान पोळ, माऊली चंदनशिव, सिद्धेश्वर गायकवाड, सुदाम चव्हाण, सिद्धेश्वर लांडे, राजेभाऊ घायतिडक, राहुल सोळंके, सुभाष शिंदे यांनी केली आहे.



# गांधीजींचे विचार जोपासण्याची गरज

## डॉ.योगिता होके पाटील यांचे प्रतिपादन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : महात्मा गांधींच्या विचारापासून दूर राहील असे एकही क्षेत्र जगात नाही. या महान विभूतीने सामान्य माणसांच्या मनाचा ठाव घेतला व त्याचे हृदय काबीज केले म्हणूनच ते युगपुरुष आहेत, असे प्रतिपादन प्रमुख व्याख्यात्या प्रा.डॉ.योगिता तौर-होके पाटील यांनी केले. त्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती प्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

या वेळी व्यासपीठावर भा.शि.प्र.संस्थेचे उपाध्यक्ष राधेश्याम लोहिया, स्थानिक अध्यक्ष प्रकाश दुगड, प्राचार्य डॉ.महेश देशमुख, उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, प्रा.संतोष लिंबकर, डॉ.प्रेम राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या आरंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री व दत्तोपंत ठेंगडी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात केले.

पुढे बोलतांना डॉ.योगिता होके म्हणाल्या की, गांधीजीचे विचार संयम, अहिंसा व शिस्त हे आजच्या तरुण पिढीसाठी आवश्यक आहेत. हे त्यांनी अनेक उदाहरणादाखल पटवून दिले. उच्चशिक्षणात गांधीजींच्या सत्य या मूल्यास पुढे ठेवून संशोधनाचा दर्जा वाढवला पाहिजे. स्वच्छता ही मानवी जीवनाच्या विकासासाठी गरजेचे गोष्ट आहे. गांधीजींनी सांगितलेल्या या गोष्टीची कोरोना काळात जाणीव होत आहे. सत्यासाठी सत्याग्रह केला पाहिजे हिंसा नव्हे असे वेगवेगळे गांधीजीचे तत्व सांगून खेड्याचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकणार नाही असे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय समारोप प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष राधेश्याम लोहिया म्हणाले की, कर्तृत्वाने माणसे मोठी होतात महापुरुषांच्या विचारधारांची अंमलबजावणी करून ते विचार पुढे नेले पाहिजेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व परिचय उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना यांनी केले, तर सूत्रसंचालन उपप्राचार्य युवराज मुळ्ये, आभार डॉ.प्रेम राठोड मानले. पद्य डॉ.साधना घडसिंग यांनी सादर केले. शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दानशूरतेमुळे वाढला रक्ताच्या नात्यांचा 'जिव्हाळा'

## जिल्हाधिकाऱ्यांकडून कौतुकाची थाप; प्रशस्तीपत्र देवून सन्मान

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील श्री सिध्देश्वर विद्यालयातील वर्ग मित्रांनी मिळून 'जिव्हाळा ग्रुप'ची निर्मिती करुन सामाजिक सांस्कृतिक कार्यचा वसा घेतला असतांना जिल्ह्यात पडलेल्या कमी पडलेला रक्तसाठा पाहाता जिव्हाळा ग्रुपच्या मित्रांनी घेतलेल्या रक्तदान शिबिरात उल्लेखनीय काम केल्यामुळे रक्तदानामध्ये जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळवल्याचा बहुमान मिळवत जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांनी जिव्हाळा ग्रुपचा प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला.

श्री सिध्देश्वर विद्यालयात बालपणा पासुन दहावी पर्यत शिकणाऱ्या १९९१ च्या बॅचने सोशल मिडियाच्या मार्फत



देशभर आसलेल्या मित्रांना एकत्र करत जिव्हाळा ग्रुप तयार करुन कौटुंबिक कार्यक्रम घेत सामाजिक उपक्रमाचा वसा घेण्याच्या ध्येयाने गेली अनेक वर्षापासून पाणी फाऊंडेशनच्या वॉटर कपसाठी व्हरकटवाडी, नाळवंडी येथे केलेले श्रमदान, माजलगाव शहरासह तालुक्यात केलेले वृक्षारोपण संगोपण, इतिहासातील गडकिल्ले सर करणे, या सह गोरगरीबांना कोरोना काळात केलेली मदत या सारखे सामाजिक उपक्रमाचा आलेख वाढवत असतांना बीड जिल्ह्यात वाढत्या कोरोना पेशंटमुळे रक्त पुरवठ्याचा तुटवडा असल्याच्या प्रशासनाच्या आवाहनास जिव्हाळा ग्रुपने प्रतिसाद देत दि.१२ जानेवारी २०२१ रोजी भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते. जिल्ह्यातील एकूण प्रमुख १० संस्थेमध्ये पहिला क्रमांक याच जिव्हाळा ग्रुपने मिळवल्या मुळे जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांच्या हस्ते जिव्हाळा ग्रुपचा सन्मान करण्यात आला यावेळी सन्मानपत्र देण्यात आले. या वेळी डॉ.राजेश रुद्रवार, डॉ.अजयसिंह डाके, नारायण टकले, प्रा.गोविंद कराड, राजाभाऊ आढाव, हे जिव्हाळा ग्रुपचे मित्र उपस्थित होते.

### राजेवाडीतील महिलेला मुकादमाकडून जबर मारहाण

▶ प्रतिनिधी

माजलगाव : दिंद्रुड पोलीस ठाणे अंतर्गत येत असलेल्या राजेवाडी येथील एका महिलेला मुकादमाने बळजबरीने गंगाखेडला नेऊन लाथा-बुक्यांनी बेदम मारहाण केली. दरम्यान, संबंधित मुकादमाने वाईट हेतूने अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

दिंद्रुड पोलिसांना दिलेल्या तक्रारीत राजेवाडी येथील महिलेने म्हटले आहे की, दि.१ ऑक्टोबर रोजी मुकादम लक्ष्मण गोविंद गायकवाड याने आपणास गंगाखेडमध्ये नेऊन पत्र्याच्या शेडमध्ये ठेवले. वाईट हेतूने हात धरला. आणि लाथा-बुक्यांनी बेदम मारहाण केली. दरम्यान, ५० हजार रूपये दे म्हणून तगादा लावला. आणि जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी दिंद्रुड पोलिस ठाण्यात नुसार गुन्हे दाखल झाले आहेत. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक सुभाष कराड हे करीत आहेत.



# दत्तोपंत ठेंगडी यांच्या जीवनावरील माहितीपट फलक प्रदर्शित

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या संपूर्ण जीवनकार्याचा वेध घेणार माहिती पट फलक, ज्यामध्ये त्यांच्या संपूर्ण जीवनावर प्रकाशझोत टाकून, त्यांच्या कारकिर्दीचा आढावा घेण्यात आला आहे, असा एक माहिती पटफलक महाविद्यालयात प्रदर्शित करण्यात आला आहे.

या प्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थाचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, सहकार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, संस्था पालक विवेकराव आयचीत, तालुका संघचालक गोरक्षनाथ बदाडे, स्थानिक व्यवस्था मंडळ अध्यक्ष प्रकाश दुगड, स्थानिक व्यवस्था मंडळ कार्यवाह अमरनाथ खुर्पे, प्राचार्य डॉ.महेश देशमुख,संयोजक प्रा.डॉ.कमलकिशोर लड्डा, प्रा.डॉ.गजानन होन्ना, प्रा.डॉ.सुनिल पाटील, प्रा.युवराज मुळ्ये, प्रा.संतोष लिंबकर, प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर, प्रा.डॉ.विकास बोरगावकर, प्रा.डॉ.रमेश गटकळ यांच्यासह संस्था पदाधिकारी, सदस्य व महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# वक्तृत्व स्पर्धेत सायली गायके चमकली

▶ प्रतिनिधी

ओझर : येथे श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या जगदवंदनीय राष्ट्रसंत जगद्गुरु जनार्दन स्वामी यांच्या मातोश्री म्हाळसामाता पुण्यतिथी सोहळानिमित्त श्री संत जनार्दन स्वामी संस्कार संस्था अंतर्गत विविध गुरूकुल अंतर्गत वक्तृत्व स्पर्धा पार पडल्या. यावेळी वेरूळ गुरूकुलातील कु.सायली गणेश गायके हिने स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला.

सर्व गुरूकुलांमधील विजेत्या स्पर्धकांची ओझर येथील माळसामाता पुण्यस्मरण सोहळ्यामध्ये वक्तृत्व स्पर्धा



पार पडली. यावेळी वेरूळ येथील श्री संत जनार्दन स्वामी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु.सायली गणेश गायके हिने 'वीर माता' या विषयावर भाषण केले. यावेळी तिला स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला. सर्व स्पर्धकांचे तसेच स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्या सर्व स्पर्धकांचे संस्थेचे अध्यक्ष श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज, संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच विद्यालयाचे प्राचार्य के.के.दवंगे यांनी अभिनंदन केले. तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.

# सरस्वती विद्यालयात बालकांचे वेलकम

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील राजेगाव येथील सरस्वती विद्यालयात सोमवारी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

कोरोना संसर्गामुळे शाळा तब्बल दीड वर्षे बंद होत्या. यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण देण्यात येत होते. सोमवारी प्रत्यक्ष शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांचा चेहरा आनंदाने फुलून गेला होता. शाळेत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक मनोज सोळंके यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. चला मुलांनो, शाळेत चला अशी साद विद्यार्थ्यांना देण्यात आली.



यावेळी मुख्याध्यापक मनोज सोळंके, अशोक कचरे, भारत गुंदेकर, मुरलीधर भाळशंकर, बालासाहेब झोडगे, दिपक कवडे, सय्यद गयास, अनंत राठोड, मनिषा शिंदे, अमर राऊत, तुळशीराम साळवे, कैलास कदम, मिलिंद देशपांडे, ओमप्रकाश कचरे, रविंद्र साळवे यांची उपस्थिती होती.

# ज्योतीराम पांढरपोटे यांना पुरस्कार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील पत्रकार ज्योतिराम पांढरपोटे यांना उदगीर येथील पत्रकार संघाचा मराठवाडा स्तरावरील २०२० चा 'उत्कृष्ट वार्ता' पुरस्कार जाहीर झाला होता. त्या पुरस्काराचे वितरण राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले.

उदगीर पत्रकार संघाच्या वतीने उत्कृष्ट वार्ता, शोध वार्ता मराठवाडास्तरीय व जीवन गौरव पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम



रविवारी उदगीर येथील उदयगीर लायन्स सभागृहात झाला. या कार्यक्रमात प्रा.सुरेश पुरी यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर माजलगाव येथील पत्रकार ज्योतिराम पांढरपोटे यांना मराठवाडा स्तरीय उत्कृष्ट वार्ता पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस बसवराज नगराळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष रामभाऊ मोतीपवळ, कार्याध्यक्ष एल.पी.उगले, सचिव दयानंद बिरादार यांची उपस्थिती होती.

# संविधानाची मूल्ये जपण्यासाठीच 'पँथर' रणांगणात

## राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांची किट्टीआडगाव येथे 'गर्जना'

▶ प्रतिनिधी



माजलगाव : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून सामाजिक न्याय आणि अधिकार दिला. या आदर्श संविधानाची मूल्ये जपण्यासाठी ऑल इंडिया पँथर सेना रणांगणात उतरली आहे, अशी गर्जना ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांनी केली. ते किट्टीआडगाव येथे बोलत होते.

ऑल इंडिया पँथर सेनेच्या किट्टीआडगाव शाखा उद्घाटन सोहळ्याला उद्घाटक म्हणून दीपक केदार यांची उपस्थिती होती. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा उद्योजक सोमनाथ चांदमारे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रांताध्यक्ष विनोद भोले, महासचिव विशाल नवघरे, जिनेश जगताप, मराठवाडा संघटक गोविंद उजगरे, बीड जिल्हाध्यक्ष सोनाजी घडसे, जिल्हा संघटक वैजनाथ पायके, विलास उजगरे, प्रल्हाद डावरे, हमीद शेख, सुनिल पेनुरकर, त्रिंबक ससाणे, संदिप सिरसट, संदिपान भद्रे आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक स्वागताध्यक्ष भगवान ससाणे यांनी केले. यावेळी उपस्थितांना दीपक केदार यांनी मार्गदर्शन केले. आत्मसन्मानाची लढाई लढण्यासाठी ऑल इंडीया पँथर सेना संघटन उभे करत आहे. त्यात युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन चांदमारे यांनी केले.



### सच्चा आंबेडकरी चळवळीतील नेत्याला बळ द्या : वैजनाथ पायके

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अन्याय झाला की, आमचे नेते दीपक केदार धावून जातात. अशा या सच्चा आंबेडकरी चळवळीतील नेत्याला बळ द्यावे. यातूनच चळवळही सशक्त होवून समाजाचे प्रश्न ऐरणीवर आणणे आणि त्यांची सोडवणूक करणे सहज शक्य होईल. यासाठी समाजाने एकत्र यावे असे आवाहन जिल्हा संघटक वैजनाथ पायके यांनी केले.



# शिवसेना नेते चंद्रकांत खैरे शेतकऱ्यांच्या बांधावर

▶ प्रतिनिधी

बीड : मराठवाड्यातील अतिवृष्टी आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळे नदी–नाल्यांना महापूर आल्याने शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले आहे. मराठवाड्यातील नुकसान ग्रस्त भागातील शेतकरी बांधवांचे उभे पीक वाहून गेल्याचे आणि शेतात गुडघ्यापर्यंत पाणी साचून जमिनीवर मोठमोठे खड्डे पडल्याचे निदर्शनास येत आहे. शहरातील व ग्रामीण भागातील रस्त्याचे व पुलांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे लवकरच मोठी घोषणा करुन बळीराजाला या संकटातून बाहेर काढतील. तसेच या संकटप्रसंगी शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे, असे प्रतिपादन शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी केले. गत पंधरा दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. खरीप पीके उध्दवस्त झालेली आहे. शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी सोमवार बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीबाधित भागाची पाहणी केली.



# डॉ.आंबेडकर यांचे विचार जगाला तारणारे

## गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांचे प्रतिपादन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : भाषाज्ञान अधिकाधिक वाढवून आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे भाषाज्ञानी बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे प्रतिपादन माजलगाव तालुक्याचे शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय गटशिक्षणाधिकरी लक्ष्मण बेडसकर यांनी माजलगाव जिल्हा परिषद कन्या प्रशालेत एका कार्यक्रमाप्रसंगी केले.

डॉ.बी.आर.आंबेडकर भाषाज्ञान संवर्धन समितीच्या वतीने चौथ्या वर्षीच्या आयोजित छात्रवृत्ती वितरण तथा अभिष्टचिंतन समारोह २०२१ च्या कार्यक्रमात ते बोलत होते. बेडसकर पुढे म्हणाले की, भाषाज्ञान विषयजक्षेत्रा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे खूप मोठे योगदान आणि कार्य आहे. सखोल भाषा अभ्यास व आपल्या संविधानिक कार्यात झोकून देऊन कर्तव्य पार पाडताना, जगातील बुद्धिझम च अभ्यास करताना डॉ.बाबासाहेबांनी स्वतः तयार केलेला शब्हकोषही आताशा उजेडात येत आहे. डॉ.आंबेडकरांचे भाषाविषयक मौलिक कार्याबाबतचे मोठे साहित्य अजूनही जगासमोर यायचे शिल्लक आहे असे साहित्य वर्तुळातून वाचावयास मिळते. तेंव्हा त्यांच्या शब्दसंपत्तीची अथांगताही आपल्या लक्षात येऊ शकत नाही.

त्यांच्या विद्वत्तापूर्ण भाषण तसेच पत्रकारीय लेखनातील भाषेचा दर्जा आपल्या देशातील अत्युच्च अशा विवेकी भाषासमृध्दीच्या परंपरेची ओळख तर देतेच परंतू आपल्याला नवा दुर्दम्य आत्मविश्वास प्रदान करते. म्हणून प्रत्येकाने, खास करून शिक्षक व विद्यार्थी यांनी ध्येयासक्त होऊन सखोलतेने भाषाज्ञान करून घ्यायला हवे.

डॉ.बी.आर.आंबेडकर भाषाज्ञान संवर्धन छात्रवृत्ती वितरण व अभिष्टचिंतन २०२१ कार्यक्रम भाषाज्ञान संवर्धन समितीचे संयोजक दीपककुमार भालेराव हे मागील चार वर्षापासून सातत्याने करतात यावर्षी दि. १ ऑक्टोबर रोजी सदरील कार्यक्रमाचे आयोजन त्यांनी कन्या प्रशालेत केले होते. या वर्षाकरिताची छात्रवृत्ती कन्या प्रशालेतील विद्यार्थीनी कु.अपर्णा विष्णू शिंदे हीला हिंदी विषयात सर्वाधिक ९४गुण मिळाल्याने जाहीर झाली होती. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सदरील छात्रवृत्तीची रोख रक्कम एक हजार रूपये, समितीचे प्रमाणपत्र, पुष्पहार, पुष्पगुच्छ देवून तिला व तिची आई पालक ह्यांना गौरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक शंकर नवगणकर सर होते. तर समितीचे निदेशक सेवानिवृत्त हिंदी अध्यापक एम.बी.चांदमारे, कास्ट्राईब महासंघाचे तालुकाध्यक्ष दयानंद खोपे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी विशेष जिल्हा शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षिका समुद्रे तसेच सेवानिवृत्त शिक्षक चंद्रशेखर बी.शेळके यांचाही सेवपूर्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कन्या शाळेतील शिक्षक नायबळ यांनी केले. शिक्षिका शिल्पा कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतातून सत्कारमूर्तींना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आभार राज खुडे यांनी मानले. कार्यक्रमास कन्या प्रशाळेतील सर्व शिक्षक बंधू भगिनीसह तालुक्यातील शिक्षक, शिक्षणप्रेमी नागरिक, भाषास्नेही युवक युवती यांची उपस्थिती होती. यशस्वीतेसाठी शिवाजी काळे, गोरख उघडे यांनी परिश्रम घेतले.

# सिंदफणावरील जुना पूल रहदारीस बंद करा

## जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांचे तहसिलदारांना निवेदन

▶ प्रतिनिधी



माजलगाव : 'अतिउत्साही माजलगावकरांना कुणी आवरे रे!' या संपादकीय लेखाची दखल घेत काँग्रेसच्या अनुसुचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी सिंदफणा नदीवरील जुना पूल रहदारी बंद करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. या बाबतचे निवेदन नायब तहसिलदार अशोक भंडारे यांना दिले आहे.

सिंदफणा नदीच्या जुन्या पुलावरील रहदारी पूरसदृश परिस्थिती लक्षात घेता कायम बंद करणे बाबतचे निवेदन काँग्रेस कमिटी अनुसुचित जाती विभागाच्या वतीने जिल्हाध्यक्ष तथा संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती सदस्य दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात तहसीलदार यांना सोमवारी देण्यात आले. यावेळी शहरालगत असणाऱ्या सिंदफणा नदीच्या जुन्या पुलावरील रहदारी चालू असून सध्या अवकाळी व अस्मानी संकटाचा कसलाही वेध घेणे शक्य होत नसून, ऐन वेळी पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आपण पाहिली आहे व पुढच्या काळात ही तशी शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत अतिउत्साही माजलगावकर यांना पाण्याचा मोह न आवरता जुन्या पुलावरून सेल्फी घेणे, व्हिडिओ बनवणे, पाण्यात गळाच्या सहाय्याने मासेमारी करणे असे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. अशा या अतिउत्साही हलगर्जीपणामुळे जिवितहानी होणे नाकारता येत नाही.जुन्या पुलावरील रहदारी बंद करण्यासाठी योग्य ती योजना आखून तात्काळ बंद करण्यात यावी असे सदरील निवेदनात जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी म्हटले आहे. तसेच येणाऱ्या काळात अतिवृष्टीचा इशारा हवामान खात्याने वर्तविला असून, शहरातील व एकूणच तालुक्यातील लोकांनी अतिशोक्ती करणे टाळावे असे आवाहन काँग्रेस अनुसुचित जाती विभागाच्या वतीने जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे सर्व लोकांना आवाहन केले आहे. यावेळी समन्वय व पुनर्विलोकन समिती सदस्य अनंत घडशिंगे, किशोर कांबळे, दादा घडशिंगे, नारायण कांबळे सह काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

### 'संजीवनी'चे संजय सपाटे यांचा गौरव



दिंद्रुड : येथे सहकार क्षेत्रात वेगळा ठसा उमटवणारे अभ्यासू व्यक्तिमत्त्व, 'वर्तमान'चे हितचिंतक तथा 'संजीवनी'चे सीईओ संजय सपाटे यांचा वाढदिवसानिमित्त गौरव करताना जेष्ठ पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने, सामाजिक नेते दीपक गडसिंग, सतीश देशमाने, राजेश धिरडे.

# 'ओला दुष्काळ जाहीर करा; शेतकऱ्यांना मदत द्या'

▶ प्रतिनिधी

माजलगाव : अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे, त्यामुळे दौरे व पंचनामे यांचा फार्स न करता अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरीव मदत करण्यात यावी नसता सोमवारी माजलगाव तहसिलवर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव कॉ.बाबा, दत्ता डाके, मोहन जाधव, सय्यद याकुब, यांनी दिला आहे.

मराठवाडा व विदर्भातील ओढे, नदी–नाल्यांना पूर आल्याने शेती संपूर्णपणे वाहून गेली आहे. खरीप हंगामातील हातातोंडाशी आलेले सोयाबीन, कापूस व इतर पिके संपूर्णपणे नष्ट झाली आहेत. आपत्तीच्या अशा भीषण कालावधीमध्ये केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर करावी व २०२० चा पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने करण्यात येत आहे. केंद्र व राज्य सरकारने मिळून तातडीची दिवाळीच्या आदी प्राथमिक मदत म्हणून प्रति हेक्टर ५० हजार रूपये शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करावेत व त्यानंतर पीक व शेतजमीन नुकसानीचा योग्य अंदाज घेत शेतकऱ्यांचे उर्वरित संपूर्ण नुकसान भरून निघेल अशी ठोस मदत करावी. अशी मागणीही यावेळी करण्यात आली. निदर्शने करतांना माकप कार्यकर्ते उपस्थित होते.















आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.